भूसंपादन गतिमान करून उद्योगांना वेळेत जमीन द्या : फडणवीस

एमआयडीसीच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी प्रक्रियेत सुलभीकरण; ६६ हजार एकर भूसंपादन सुरू, ५,५०२ कोटींचा महसूल

मुंबई, दि. ०५ (प्रतिनिधी) : राज्यातील औद्योगिक विकासाला अधिक वेग देण्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया गतिमान करून उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. मुंबईतील 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासंदर्भातील उच्चस्तरीय आढावा बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना कार्यवाहीला गती देण्यास सांगितले. उद्योगांना जमीन मिळण्यात होणारा विलंब कमी करण्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्याबरोबरच भूखंड वाटप अधिक पारदर्शक आणि कालबद्ध करण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात नव्या औद्योगिक वसाहतींचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत असून त्यासाठी वेळेत जमीन उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी आणि उद्योग उभारणीतील अडथळे दूर करण्यासाठी भूसंपादनाच्या प्रत्येक टप्प्यावर गती आणावी. उच्चाधिकार समितीच्या मंजुरी, विविध प्रशासकीय प्रक्रिया आणि वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी आवश्यक ते बदल तातडीने करावेत.

बैठकीत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, राज्यात सध्या ६६ हजार ३४३ एकर जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू असून गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, पुणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये त्याचे काम वेगाने सुरू आहे. तसेच राज्य सरकारने केलेल्या ९७ सामंजस्य करारांनुसार सुमारे ७५ हजार २३४ एकर जमिनीची आवश्यकता असून त्यासाठीही आवश्यक कार्यवाही सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. राज्यात उद्योगवाढीसाठी मोठ्या प्रमाणावर जमीन उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

औद्योगिक भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'मिलाप' या ऑनलाइन प्रणालीचा वापर करण्यात येत असल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली. या प्रणालीद्वारे अर्ज सादर करणे, रिअल-टाइम स्थिती पाहणे, ऑफर लेटर आणि भूखंड वाटप आदेशांचे स्वयंचलित वितरण तसेच डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात १,१८३ औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यातून ५,५०२ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.

धावत्या लोकलमध्ये स्टंट करणारा तरुण आरपीएफच्या ताब्यात

मुंबई, दि. ०५ (प्रतिनिधी) : धावत्या उपनगरीय लोकलमध्ये जीवघेणा स्टंट करून त्याचा व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रसारित करणाऱ्या २२ वर्षीय तरुणाला मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) ताब्यात घेतले आहे. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आरपीएफने तातडीने तपास सुरू करून कळवा परिसरातून आरोपीचा शोध घेत कारवाई केली. या प्रकारामुळे स्वतःचा तसेच इतर प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याने रेल्वे प्रशासनाने अशा कृत्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे.

आरपीएफने दिलेल्या माहितीनुसार, कळवा येथील रहिवासी मोहम्मद खुर्शीद (वय २२) याने २ ऑगस्ट २०२६ रोजी कळवा रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ वर धावत्या उपनगरीय लोकलमध्ये धोकादायक स्टंट केला होता. या प्रकाराचे चित्रीकरण करून त्याने तो व्हिडिओ आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर अपलोड केला होता. व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर आरपीएफने कळवा-मुंब्रा परिसरात शोधमोहीम राबवून ४ ऑगस्ट रोजी आरोपीला कळवा (पूर्व) येथून ताब्यात घेतले.

या प्रकरणाची नोंद मुंब्रा आरपीएफ पोस्टमध्ये करण्यात आली असून रेल्वे कायद्याच्या कलम १५४, १४५ आणि १५६ अंतर्गत आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम ३५(३) अन्वये नोटीस बजावून त्याला ५ ऑगस्ट रोजी कल्याण येथील रेल्वे न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला दंड ठोठावत भविष्यात अशा प्रकारची कृती न करण्याची ताकीद देऊन मुक्त केले.

मध्य रेल्वेने प्रवाशांना धावत्या गाड्या, फूटबोर्ड, छत किंवा रेल्वे रुळांवर स्टंट करून 'रील्स' तयार न करण्याचे आवाहन केले आहे. अशा कृतींमुळे विजेचा धक्का, गाडीतून पडणे किंवा अपघात होण्याचा गंभीर धोका असून त्या रेल्वे कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हा आहेत. अशा प्रकारांची माहिती प्रवाशांनी रेल्वे हेल्पलाईन क्रमांक १३९, आरपीएफ किंवा शासकीय रेल्वे पोलिसांना तातडीने द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दीड महिन्यानंतर शिंगढोळ गावाचा वीजपुरवठा पूर्ववत

कर्जत, दि. ०५ (वार्ताहर) : कर्जत तालुक्यातील रजपे समूह ग्रामपंचायतीअंतर्गत शिंगढोळ गावातील खराब झालेल्या वीज रोहित्रामुळे तब्बल दीड महिन्यांहून अधिक काळ खंडित असलेला वीजपुरवठा अखेर पूर्ववत झाला आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुका सचिव रामदास घरत यांच्या पाठपुराव्यानंतर महावितरणने पनवेल येथून नवीन रोहित्र उपलब्ध करून ते तातडीने बसविले. त्यामुळे सुमारे ७० घरांच्या गावाला पुन्हा वीज मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

पावसाळ्यात सतत होणारा मुसळधार पाऊस, वारंवार होणारा कमी-जास्त विद्युतदाब आणि वीजपुरवठ्यातील खंड यामुळे शिंगढोळ गावातील रोहित्र निकामी झाले होते. परिणामी संपूर्ण गाव अंधारात गेले होते. दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते.

ग्रामस्थांच्या अडचणी लक्षात घेऊन रामदास घरत यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधला. त्यांच्या पाठपुराव्यानंतर पनवेल येथून नवीन रोहित्र आणण्यात आले. महावितरणचे वायरमन दिलीप लोभी यांनी शिंगढोळ येथे येऊन नवीन रोहित्र बसविण्याचे काम पूर्ण केले. या वेळी योगेश घरत, समाधान कडू, भगवान घरत, दिलीप कडू, हणमंत घरत, प्रणित घरत, जगदीश फाळे, पराग घरत, कांतीलाल घरत, प्रमोद घरत, स्वप्निल घरत यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी सहकार्य केले.

महावितरणचे उपअभियंता चंद्रकांत केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर गावातील वीजपुरवठा सुरळीत सुरू झाला. दीर्घ प्रतीक्षेनंतर गावात पुन्हा उजेड परतल्याने ग्रामस्थांनी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तसेच पाठपुरावा करणाऱ्या स्थानिक कार्यकर्त्यांचे आभार मानले. दरम्यान, पावसाळ्यात शॉर्टसर्किट किंवा इतर तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने काही वेळा वीजपुरवठा तात्पुरता खंडित करावा लागतो, असे महावितरणकडून सांगण्यात आले असून अशा परिस्थितीत नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सौर सिंचनाचे महाराष्ट्र मॉडेल जगासाठी ठरत आहे दिशादर्शक

११ लाख सौर कृषी पंप, ६ हजार मेगावॅट सौर प्रकल्प; ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मिळाली मोठी चालना

मुंबई, दि. ०५ (प्रतिनिधी) : मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० आणि 'मागेल त्याला सौर कृषी पंप' या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्राने सौर ऊर्जेच्या आधारे कृषी सिंचन क्षेत्रात देशात आघाडी घेतली असून हे मॉडेल आता इतर राज्यांसह जागतिक पातळीवरील विकसनशील देशांसाठीही उपयुक्त ठरत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले. महावितरण, एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) आणि 'मित्रा' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी सिंचनासाठी सौर ऊर्जेच्या वापरावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

लोकेश चंद्र यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशाच्या ऊर्जा वापरात नवीकरणीय ऊर्जेचा वाटा किमान ५० टक्के करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्याच धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणने मार्च २०२७ पर्यंत राज्यातील कृषी सिंचनासाठी शंभर टक्के वीजपुरवठा सौर ऊर्जेद्वारे करण्याचे नियोजन केले आहे. राज्यात आतापर्यंत ११ लाख सौर कृषी पंप बसविण्यात आले असून त्याचा लाभ ११ लाख शेतकऱ्यांना झाला आहे. यामुळे सुमारे ४० लाख एकर क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत.

ते पुढे म्हणाले की, सौर ऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांना दिवसा आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळत असून सिंचनाचा खर्च कमी झाला आहे. पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढल्याने हवामान बदलाच्या परिणामांशी सामना करण्यासही मदत होत आहे. ब्राझील येथे झालेल्या जागतिक हवामान परिषदेत महाराष्ट्राचे सौर सिंचन मॉडेल सादर करण्यात आले असून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. तसेच इंटरनॅशनल सोलर अलायन्ससोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे हे मॉडेल इतर विकसनशील देशांमध्येही राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कन्या शकुंतलाबाई यांचे निधन

मुंबई, दि. ०५ (प्रतिनिधी) : लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या द्वितीय कन्या शकुंतला अजित सपताल यांचे २ ऑगस्ट रोजी पहाटे २.४५ वाजता प्रदीर्घ आजाराने वयाच्या ९२ व्या वर्षी नालासोपारा येथील रुग्णालयात निधन झाले. ब्रेन स्ट्रोक झाल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. नालासोपारा येथे मुलगा प्रशांत यांच्या निवासस्थानी त्या वास्तव्यास होत्या. त्यांच्या पार्थिवावर नालासोपारा येथे निकटवर्तीयांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात संजय, राजेश, प्रशांत ही तीन मुले, नंदिनी ही मुलगी तसेच नातवंडे असा परिवार आहे.

शकुंतलाबाई या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक जीवनाच्या अखेरच्या साक्षीदार मानल्या जात होत्या. बालपणापासूनच त्या कम्युनिस्ट पक्षाच्या विविध उपक्रमांत सक्रिय होत्या. ज्येष्ठ बहीण शांताबाई, रोझा डांगे, कमल आणि सत्येंद्र मोरे, प्रभाकर मिरजकर, सुमन मोकाशी यांच्यासह त्यांनी बालसंघ आणि सांस्कृतिक कला पथकात काम केले. आई जयवंताबाई साठे यांच्यासोबत पक्षाच्या मुखपत्रांच्या वितरणातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

अंबरनाथमध्ये अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य

साहित्यिक वारशाला अभिवादन; गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

अंबरनाथ, दि. ०५ (वार्ताहर) : साहित्यसम्राट शैक्षणिक, सामाजिक प्रतिष्ठान, अंबरनाथ शहरच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त कै. शांताराम जाधव ज्येष्ठ नागरिक सभागृह, अंबरनाथ (पूर्व) येथे अभिवादन कार्यक्रम आणि गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष साहित्यिक विजय हनवते होते, तर अंबरनाथ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तेजश्री करंजुले पाटील या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी नगरसेवक ॲड. संदीप भराडे, सेवानिवृत्त मंत्रालय अपर सचिव मनोहर बंदपट्टे, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा पौर्णिमा जाधव, कांचन मिश्रा, अखिल भारतीय मानवाधिकार संघटनेचे गव्हर्नर अजयराव चिरीवेला, शिवसेनेचे पुरुषोत्तम उगले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात विजय हनवते यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा, साहित्यिक योगदानाचा आणि सामाजिक कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि ज्ञानाची कास धरून समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. नगराध्यक्षा तेजश्री करंजुले पाटील यांनी विद्यार्थ्यांनी इतिहासाची जाण ठेवून शिक्षण आणि परिश्रमाला प्राधान्य दिल्यास यश निश्चित मिळते, असे सांगितले. तसेच धर्मवीर आनंद दिघे नाट्यगृह परिसरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रतिष्ठानचे सचिव शत्रुघ्न भिमाकांत उमाप यांनी अंबरनाथमधील नाट्यगृहाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी विविध सामाजिक संघटनांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. प्रतिष्ठानची स्थापना समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शहरातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वह्या आणि डब्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खजिनदार सुंदरलाल डांगे, गणेश गायकवाड, फाल्गुनी गायकवाड, संजय केंगार, राहुल शिरसाठ, काशिनाथ गायकवाड तसेच प्रतिष्ठानच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राईज लिमिटेड

युनिट क्र. ५०२, सी विंग, वन बीकेसी, रेडियस डेव्हलपर्स, प्लॉट क्र. सी ६६, जी ब्लॉक,
वांद्रे कुर्ला संकुल, मुंबई: ४०० ०५१

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री नोटीस

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) आणि नियम ९(१) च्या तरतुदीसह वाचला जाणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः **हनुमंत आबाशेब शिंदे (कर्जदार) आणि मनीषा हनुमंत शिंदे (सह-कर्जदार)** यांना नोटीस देण्यात येते की, **एसीआरई-८०-ट्रस्ट [सीआयएनः U65993DL2002PLC115769]** चे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेल्या ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राईज लिमिटेड ("सुरक्षित धनको") कडे गहाण ठेवलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती मालमत्ता **हनुमंत आबाशेब शिंदे (कर्जदार) आणि मनीषा हनुमंत शिंदे (सह-कर्जदार)** यांच्याकडून सुरक्षित धनकोंना येणे असलेल्या थकीत मुद्दल, थकबाकी (जमा झालेल्या विलंब शुल्कासह) आणि १६.०६.२०२६ पर्यंतचे व्याज तसेच कर्ज करार आणि इतर संबंधित कर्ज दस्तऐवजांनुसार दि. १७.०६.२०२६ पासून लागू होणारे पुढील व्याज व कायदेशीर खर्च आणि इतर शुल्कासह एकूण **रु.३६,३२,८८९.९५/- (अक्षरी रुपये छत्तीस लाख बत्तीस हजार आठशे एकोणनव्वद आणि पंच्याण्णव पैसे मात्र)** च्या वसुलीसाठी **दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ०२:३० ते दुपारी ०३:३० या वेळेत "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे तशी आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर विकली जाईल.

वरील **कर्ज खाते क्र. LAURSTH0000070218,** तसेच स्थावर मालमत्तेसह सर्व हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, अंतर्निहित सुरक्षा, तारण आणि/किंवा हमी, निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाईस हाउसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) द्वारे दिनांक **१९.०७.२०२३** रोजीच्या आणि **०८.०९.२०२३** रोजी नोंदणीकृत झालेल्या अभिहस्तांकन कराराद्वारे एसीआरई-८०-ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेल्या ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राईज लिमिटेड ('एसीआरई'/सुरक्षित धनको) यांच्या बाजूने अभिहस्तांकित करण्यात आले आहे. याद्वारे, सुरक्षित धनकोंनी वित्तीय सुविधेचा विधिवत ताबा घेतला आहे आणि अशाप्रकारे ते गहाण मालमत्तेच्या संदर्भात कर्ज करार आणि इतर संबंधित दस्तऐवजांनुसार त्यांची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी आणि/किंवा सुरक्षा हितसंबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अधिकारांनी निहित आणि पात्र आहेत.

स्थावर मालमत्तेची राखीव किंमत **रु. १८,५०,०००/- (अक्षरी रुपये अठरा लाख पन्नास हजार मात्र)** असेल आणि इसारा ठेव रक्कम ("ईएमडी") **रु. १,८५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र)** म्हणजेच राखीव किमतीच्या १०% असेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन:

गट क्र. २३४/२, गाव सावंगी, तालुका आणि [जि.] औरंगाबाद येथे स्थित 'सारा परिवर्तन सेक्टर - बी' म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीतील ई-टाईप, विंग-३ मध्ये स्टिल्ट पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ०४, ज्याचे चटई क्षेत्रफळ ४७.१९ चौ. मीटर, अंगभूत क्षेत्रफळ ४९.२९ चौ. मीटर, बाल्कनी/बंदिस्त बाल्कनी क्षेत्रफळ ९.४१ चौ. मीटर, मोकळ्या गच्चीचे क्षेत्रफळ ० चौ. मीटर (एकूण मोजमाप ४९.२९) असलेल्या मालमत्तेचा सर्व तो भाग आणि पार्सल.

चतुःसीमाः **पूर्वः** फ्लॅट क्र. ०३ विंग-०३ **पश्चिमः** साईड मार्जिनल स्पेस (बाजूची मोकळी जागा) **उत्तरः** फ्लॅट क्र. ०५, विंग ०३ आणि डक्ट **दक्षिणः** ॲप्रोच (रस्ता/प्रवेश)

विक्रीच्या सविस्तर नियम आणि अटींसाठी, कृपया सुरक्षित धनकोंच्या वेबसाईटवरील म्हणजेच www.acreindia.in या लिंकवर जावे; **संपर्क क्र.: ९९६७२८०४४८ / ९८२०७९६१४३**

बोली लावण्यासाठी, **https://www.bankeauctions.com** वर लॉग इन करा.

दिनांकः ०६.०८.२०२६
ठिकाणः मुंबई

सही/- प्राधिकृत अधिकारी
ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राईज लि.
एसीआरई-८०-ट्रस्टचे विश्वस्त

रोझ मर्क लिमिटेड

सीआयएनः L93190MH1985PLC035078
नोंदणीकृत कार्यालयः १५/बी/४, न्यू सायन सीएचएस, एसआयईएस कॉलेज,
डी मार्टच्या मागे, सायन पश्चिम, मुंबई - ४०००२२ महाराष्ट्र, भारत
ई-मेल आयडीः info@rosemerc.in दूरध्वनीः ०२२ ३५१३ ८३९७ **वेबसाईटः www.rosemerc.in**

१४ जुलै २०२६ रोजीच्या पोस्टल बॅलेट नोटिशीचे शुद्धीपत्रक

याद्वारे नोटीस देण्यात येते की, रोझ मर्क लिमिटेड ("कंपनी") ने कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदी आणि त्यासह लागू असलेले नियम, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सेबी) यांनी जारी केलेली लागू परिपत्रके आणि इतर लागू कायद्यांनुसार, त्यामध्ये नमूद केलेल्या ठरावांवर रिमोट ई-व्होटिंगद्वारे सदस्यांची मान्यता मिळवण्यासाठी १४ जुलै २०२६ रोजीची पोस्टल बॅलेट नोटीस इलेक्ट्रॉनिक स्वरूपात आपल्या सदस्यांना पाठवली होती.

रिमोट ई-व्होटिंग **बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता (आयएसटी)** सुरू झाले असून ते **गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (आयएसटी)** खुले राहील.

पोस्टल बॅलेट नोटीस पाठवल्यानंतर आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन २८(१) अंतर्गत बीएसई लिमिटेडकडून तत्त्वतः मान्यता मिळवण्यासाठी कंपनीने केलेल्या अर्जानुसार, बीएसई लिमिटेडने कंपनीला इक्विटी शेअर्स आणि कन्व्हर्टिबल वॉरंट्सच्या प्रस्तावित प्राधान्य इश्यूशी संबंधित बाब क्र. ६ आणि ७ च्या स्पष्टीकरणात्मक निवेदनाचा मुद्दा क्र. ६ चा भाग असलेल्या प्री-इश्यू आणि पोस्ट-इश्यू शेअरहोल्डिंग पॅटर्नमध्ये अद्ययावत करण्याचा सल्ला दिला आहे.

त्यानुसार, कंपनीने पोस्टल बॅलेट नोटिशीच्या स्पष्टीकरणात्मक निवेदनाचा मुद्दा क्र. ६ अद्ययावत करून **५ ऑगस्ट २०२६ रोजीचे शुद्धीपत्रक** जारी केले आहे. हे शुद्धीपत्रक १४ जुलै २०२६ रोजीच्या पोस्टल बॅलेट नोटिशीचा एक अविभाज्य भाग आहे आणि पोस्टल बॅलेट नोटीस या शुद्धीपत्रकासह एकत्रितपणे वाचली जावी.

सदस्यांना पुढे असेही सूचित करण्यात येते की, **१५ जुलै २०२६ (सकाळी ९:०० वा. आयएसटी**) रोजी किंवा त्यानंतर आणि हे शुद्धीपत्रक प्राप्त होण्यापूर्वी ठराव क्र. ६ आणि ७ वर यापूर्वीच नोंदवलेली मते वैध राहतील. तथापि, ज्या सदस्यांना या शुद्धीपत्रकात दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या मतांमध्ये बदल करायचा असेल, ते त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावरून **csdeepakrane@gmail.com** या ई-मेलवर छाननीकर्त्याला **१३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५:०० (आयएसटी)** पूर्वी ई-मेल पाठवून असे करू शकतात. या ई-मेलमध्ये त्यांनी त्यांचा फोलिओ क्रमांक/डीपी आयडी आणि क्लायंट आयडी आणि होल्डिंगचा तपशील नमूद करणे आवश्यक आहे. छाननीकर्त्याचा अहवाल तयार करताना छाननीकर्ते अशा बदलांचा विचार करतील.

रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी संपण्याच्या किमान ४८ तास आधी सदस्य त्यांच्या शंका, काही असल्यास, कंपनी सेक्रेटरींना **cs@rosemerc.in** वर पाठवू शकतात.

सदर शुद्धीपत्रक कंपनीच्या **www.rosemerc.in** या वेबसाईटवर आणि बीएसई लिमिटेडच्या **www.bseindia.com** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

या शुद्धीपत्रकात नमूद केलेल्या बदलांव्यतिरिक्त, १४ जुलै २०२६ रोजीच्या पोस्टल बॅलेट नोटिशीतील इतर सर्व मजकूर बदललेला नाही (अपरिवर्तित राहील).

रोझ मर्क लिमिटेडच्या
संचालक मंडळाच्या आदेशावरून
सही/-
वैशाली पारकर कुमार
व्यवस्थापकीय संचालिका
डीआयएनः 09159108

ठिकाणः मुंबई,
दिनांकः ०५/०८/२०२६

POST-OFFER PUBLIC ANNOUNCEMENT TO THE PUBLIC SHAREHOLDERS OF

ARCO LEASING LIMITED

Corporate Identification Number: L65910MH1984PLC031957
Registered Office: Plot No. 123, Street No.17, MIDC Marol, Andheri (E), Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400093
Contact Number: +91-22-28217222-25; Email Address: arcoleasingltd@gmail.com; Website: www.arcoleasing.com

OPEN OFFER FOR ACQUISITION OF UP TO 27,74,970 OFFER SHARES, REPRESENTING 25.57%* OF THE EXPANDED VOTING SHARE CAPITAL OF ARCO LEASING LIMITED, THE TARGET COMPANY, FROM ITS PUBLIC SHAREHOLDERS AT AN OFFER PRICE OF ₹ 10.00/- PER OFFER SHARE, PAYABLE IN CASH, BY MR. JITESH KOTHARI (ACQUIRER 1) AND MR. ATUL RAMSHANKAR JAISWAL (ACQUIRER 2), COLLECTIVELY REFERRED TO AS THE ACQUIRERS, PURSUANT TO AND IN COMPLIANCE WITH REGULATIONS 3 (1) AND 4, OF THE SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA (SUBSTANTIAL ACQUISITION OF SHARES AND TAKEOVERS) REGULATIONS, 2011, INCLUDING SUBSEQUENT AMENDMENTS THERETO.

***NOTE: IN ACCORDANCE WITH REGULATION 7 (1) OF THE SEBI (SAST) REGULATIONS, AN OPEN OFFER IS MANDATED FOR AT LEAST 26.00% OF THE TOTAL SHARES OF THE TARGET COMPANY. HOWEVER, AS ON THE DATE OF THIS PUBLIC ANNOUNCEMENT, THE SHAREHOLDING OF THE PUBLIC SHAREHOLDERS OF THE TARGET COMPANY, IS 25.57% OF THE EXPANDED VOTING SHARE CAPITAL OF THE TARGET COMPANY. THEREFORE, THE OFFER SHARES REPRESENT 25.57% OF THE EXPANDED VOTING SHARE CAPITAL OF THE TARGET COMPANY.**

This Post-Offer Public Announcement is being issued by JJ IPO Advisors Private Limited, the Manager to the Offer ('Manager'), on behalf of the Acquirers to the Public Shareholders of the Target Company, pursuant to and in compliance with the provisions of Regulation 18(12) and other applicable provisions under the SEBI (SAST) Regulations ('Post-Offer Public Announcement').

This Post-Offer Public Announcement should be read in continuation of, and in conjunction with the: a) Public Announcement dated Friday, March 13, 2026 ('Public Announcement'), (b) Detailed Public Statement dated Saturday, March 21, 2026 in connection with this Offer, published on behalf of the Acquirers on Monday March 23, 2026, in Financial Express (English daily) (All Editions), Jansatta (Hindi daily) (All Editions), and Pratahkal (Marathi Daily) (Mumbai Edition) ('Newspapers') ('Detailed Public Statement'), (c) Draft Letter of Offer dated Wednesday, April 01, 2026, filed and submitted with SEBI pursuant to the provisions of Regulation 16(1) of the SEBI (SAST) Regulations ('Draft Letter of Offer'), (d) Letter of Offer with along with Form of Acceptance-Cum-Acknowledgement (for holding Equity Shares in physical form), and Form SH-4 Securities Transfer Form dated Tuesday, June 23, 2026 ('Letter of Offer'), (e) Recommendations of the Committee of the Independent Directors of the Target Company which were approved on Tuesday, June 30, 2026 and published in the Newspapers on Wednesday, July 01, 2026 ('Recommendations of the Independent Directors of the Target Company'), (f) Pre-Offer and corrigendum to the Detailed Public Statement Advertisement dated Wednesday, July 01, 2026, which was published in the Newspapers on Thursday, July 02, 2026 ('Pre-Offer Advertisement and corrigendum to the Detailed Public Statement'), (the Public Announcement, Detailed Public Statement, Draft Letter of Offer, Letter of Offer, Recommendations of the Committee of the Independent Directors, Pre-Offer Advertisement and Corrigendum to the Detailed Public Statement of the Target Company, and this Post-Offer Public Announcement are hereinafter collectively referred to as 'Offer Documents') issued by the Manager on behalf of the Acquirers.

The capitalized terms used but not defined in this this Post-Offer Public Announcement shall have the meaning assigned to such terms in the Offer Documents.

1.	**Name of the Target Company**	M/s Arco Leasing Limited, a public limited incorporated under the provisions of the Companies Act, 1956, bearing corporate identity number 'L65910MH1984PLC031957', bearing Permanent Account Number 'AAACA4337M' allotted under the Income Tax Act, 1961, with its registered office located at Plot No 123, Street No 17, MIDC Marol Andheri (E), Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400093.	
2.	**Name of the Acquirers and PACs**	Acquirer 1, Mr. Jitesh Kothari, son of Mr. Surendra Kumar Kothari, aged 33 years, Indian Resident, bearing Permanent account number 'CQEPK4104K' allotted under the Income Tax Act, 1961, resident at Shree Niketan, Flat No B 1203, 12th Floor New Link Road, Near Lalji Pada Police Chowki, Kandivali West, Mumbai – 400067. Acquirer 1 can be contacted via telephone at '+91 87677 46807' or via Email Address at 'jiteshk01@gmail.com'.	
		Acquirer 2, Mr. Atul Ramshankar Jaiswal, son of Mr. Ramshankar Jaiswal, aged 33 years, Indian Resident, holding Permanent account number 'ASCPJ6834F' allotted under the Income Tax Act, 1961, resident at 104 K Wing, Building No 04, Ashok Nagar, L T Road, Vazira Naka, Borivali West, Mumbai, Maharashtra – 400092. Acquirer 2 can be contacted via telephone at '+91 9699622890' or via Email Address at 'cajaiswalatul@gmail.com'.	
		There are no persons acting in concert with the Acquirers for the purpose of this Offer.	
3.	**Name of Manager to the Offer**	JJ IPO Advisors Private Limited	
4.	**Name of Registrar to the Offer**	Integrated Registry Management Services Private Limited	
5.	**Offer Details**		
5.1	Date of Opening of the Offer	Friday, July 03, 2026	
5.2	Date of Closing of the Offer	Thursday, July 16, 2026	
6.	**Date of Payment of Consideration**	Thursday, July 30, 2026	
	Details of the Acquisition		
7.	**Particulars**	**Proposed in the Offer Document (Assuming full acceptance in this Offer)**	**Actuals (Pursuant to the tendering of Offer Shares by some of the Public Shareholders under this Offer)**
7.1	Offer Price	*₹ 10.00/-*	₹ 10.00/-
7.2	Aggregate number of Equity Shares tendered	*27,74,970*	300
7.3	Aggregate number of Shares accepted	*27,74,970*	300
7.4	Size of the offer (Numbers of equity shares multiplied by Offer price per equity share)	*₹ 2,77,49,700.00/-*	₹ 3,000.00/-
7.5	**Pre-Share Purchase Agreement transaction shareholding as on the date of the Public Announcement**		
a)	Number of Equity Shares	*Nil*	Nil
b)	% of Voting Share Capital	*Not Applicable*	Not Applicable
7.6	**Sale Shares proposed to be acquired by way of Share Purchase Agreement**		
a)	Number of Equity Shares	*1,28,600*	1,28,600
b)	% of Voting Share Capital	*1.18%*	1.18%
7.7	**Shares proposed to be acquired through Share Subscription Agreement**		
a)	Number of Equity Shares	*79,50,000*	79,50,000
b)	% of Voting Share Capital	*73.25%*	73.25%
7.8	**Equity Shares acquired by way of Offer**		
a)	Number of Equity Shares	*27,74,970*	300
b)	% of Voting Share Capital	*25.57%*	0.003%
7.9	**Equity Shares acquired after the Detailed Public Statement**		
a)	Number of Equity Shares acquired	Nil	Nil
b)	Price of the Equity Shares acquired	Not Applicable	Not Applicable
c)	% of Equity Shares acquired	Not Applicable	Not Applicable
7.10	**Post-Offer shareholding of the Acquirers**		
a)	Number of Equity Shares	1,08,53,570	80,78,900
b)	% of Voting Share Capital	100%	74.44%

Pre-Offer and Post-Offer shareholding of the Public Shareholders (other than the Acquirers)

7.11	**Particulars**	**Pre-Offer (Pre-Preferential Issue of Equity Shares Paid-Up Share Capital)**	**Post-Offer (Post-Preferential Issue of Equity Shares Paid-Up Share Capital)**	**Pre-Offer (Pre-Preferential Issue of Equity Shares Paid-Up Share Capital)**	**Post-Offer (Post-Preferential Issue of Equity Shares Paid-Up Share Capital)**
a)	Number of Equity Shares	1,11,470	Nil	27,74,970	27,74,670
b)	% of Voting Share Capital	46.43%	Not Applicable	25.57%	25.56%

8. The Acquirers accept full responsibility for the information contained in this Post-Offer Public Announcement and for their obligations specified under SEBI (SAST) Regulations.
9. The Acquirers will consummate the Share Purchase Agreement and the Share Subscription Agreement transaction in accordance with the provisions of Regulations 22(1), and 22(3) of the SEBI (SAST) Regulations and will make an application for reclassification of themselves as the promoters of the Target Company, in accordance with the provisions of Regulation 31A (10) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, including subsequent amendments thereto **('SEBI (LODR) Regulations')**.
10. A copy of this Post-Offer Public Announcement will be accessible on the websites of Securities and Exchange Board of India at www.sebi.gov.in, BSE Limited at www.bseindia.com and the registered office of the Target Company.

ISSUED BY MANAGER TO THE OFFER

JJ IPO
Advisors Pvt Ltd

JJ IPO Advisors Private Limited
Corporate Identification Number: U67190GJ1998PTC033649
Principal Place of Business: 13th Floor, 1301-1302, Yash Anant, Ashram Road, Ahmedabad–380009, Gujarat, India
Contact Person: Mrs. Trusha Thakkar
Contact Number: +91- 8511053533 /9998447800
Email Address: mb@jjipoadvisors.com
Investor grievance Email Address: investors@jjipoadvisors.com

SEBI Registration Number: INM000013253
Validity: Permanent

Date: Wednesday, August 05, 2026
Place: Mumbai

For and on behalf of all the Acquirers
Sd/-
Mr. Jitesh Kothari
(Acquirer 1)